# शेवंता जित्ती हाय!

प्रल्हाद जाधव

दोन अंकी नाटक

पात्र - संयोजन

पिसाळ : (४५)

कांबळे : (३०)

माणूस : (५०)

बाळासाहेब पाटील- खंडेराजुरीकर : (५५)

अंक पहिला :

(अंधारातच पडदा उघडतो. काही क्षणांनी फोनचा आवाज येऊ लागतो. त्याबरोबरच प्रकाशही येतो. पोलिसस्टेशन दिसते. भिंतीला लागून कस्टडी. कस्टडीचा भक्कम गजांचा दरवाजा दिसतो. त्यातून आतील आरोपी दिसावा,त्याच्याशी संवाद साधता यावा अशी कल्पना! एका बाजूला पोलिस निरीक्षकांची खुर्ची, टेबल इ. सरंजाम. मधोमध एक लाकडी कठडा. त्याच्या अलीकडे खुर्च्या, टेबल,बाकडे. या कचेरीचा विंगेतही विस्तार. तिकडे उपनिरीक्षक, ठाणे अंमलदार, रायटर, इ.ची व्यवस्था. हळूहळू रंगमंच उजळतो. फोन वाजतच आहे. विंगेतून कॉन्स्टेबल पिसाळ संथपणे येतो आणि फोन उचलतो.)

पिसाळ : नमस्कार कॉन्स्टेबल पिसाळ बोलतोय... हो... हां... हां... आपण कोण बोलताय? (एकदम ताठ होत) जयहिंद सर ! कांबळेसाहेब अजून आले नाहीत सर... आपला काही मेसेज असल्यास देतो मी सर... बरं... बरं... मला त्याची काही कल्पना नाही पण साहेब आल्यावर मी त्यांना सांगतो सर. येस सर... नमस्कार सर. (फोन ठेवतो) खिशातून डबी काढून तंबाखू मळू लागतो. काही क्षणांनी बाहेरून निरीक्षक सयाजीराव कांबळे यांचा आवाज)

कांबळे : अरे कोणी आहे का रे इथे? शिंदेऽ, साळुंखेऽऽ गेले कुठं सगळेजण मरायला? पोलिसस्टेशनची धर्मशाळा करुन टाकलीय सर्वांनी. (पिसाळ तंबाखू फेकून डबी खिशात टाकून धावत दरवाजाकडे जायला निघतो. तिकडून 'पिसाऽऽळ, एऽ पिसाळ...' अशा हाका मारत कांबळे आत येतात. दोघांचीही दरवाजातच भेट होते. पिसाळ “जयहिंद सर?” म्हणत सॅल्यूट ठोकतो.)

कांबळे : अरे कानाची भोकं झाली का काय तुझ्या? मी बोंबलतोय कशासाठी मघापासनं?

पिसाळ : सर...

कांबळे : काय सर सर करतोस? शिंदे कुठाहेत? साळुंखे कुठाय? पवार कुठाय? एक माणूस जाग्यावर नाही!

पिसाळ : प... प...

कांबळे : वाचा कशानं बसली तुझी? सकळी सकाळी गचकलं कुणी ॲक्सिडेंटमध्ये का रेप झाला कुणावर?

पिसाळ : रेडसाठी गेलेत सगळे!

कांबळे : मं हे आधी सांगायला काय धाड भरली होती?

पिसाळ : पण आपण मला बोलण्याची संधी –

कांबळे : बस बस आता जास्त शहाणपणा करू नको. बाहेर अंगाचं मुटकुळं करून कोण हरामखोर बसलाय तो?

पिसाळ : तुम्हांलाच भेटायला आलाय तो माणूस.

कांबळे : मला भेटायला? काय नाव त्याचं, कुठनं आलाय, कशासाठी भेटायचंय?

पिसाळ :  ते काहीही सांगायला तयार नाही. फक्त तुम्हाला भेटायचंय एवढच म्हणतोय. आणि साहेब...

कांबळे : काय?

पिसाळ :  पिऊन आलाय तो!

कांबळे :  पिऊन पोलिस स्टेशनात आलाय?आणि हे तू तोंड वर करुन सांगतोहेस मला? गांडीवर लाथ मारुन हाकलून दे साल्याला, मला अजिबात फुरसत नाही आज! आणि हो...

पिसाळ : काय सर?

कांबळे : एक चांगला कडक चहा पाठवून दे इकडं!

पिसाळ : बरं सर! (दरवाजापर्यंत जातो)

कांबळे : पिसाऽऽऽ ळ...

पिसाळ : काय सर?

कांबळे : कुणाचा काही निरोप - फोन, वायरलेस मेसेज?

पिसाळ : गोन्साल्विससाहेबांचा फोन आला होता.

कांबळे : गोन्साल्विससाहेबांचा फोन? काही विशेष? कुठनं बोलत होते?

पिसाळ : ते काय सांगितलं नाय त्यांनी. पुन्हा फोन करीन एवढंच म्हणाले.

कांबळे : बरं ठीक आहे. जा तू. आणि हो, जरा ती स्टेशन-डायरी घे इकडं! (पिसाळ स्टेशन-डायरी आणून कांबळेच्या समोर ठेवतो आणि सलाम ठोकून निघून जातो. कांबळे डायरीतील नोंदी पाहू लागतात. त्याचवेळी बाहेरुन पिसाळ आणि तो माणूस यांच्यात चाललेली बाचाबाची ऐकू येते...) ए उठ उठ... चल चालता हो इथनं!

माणूस : अहो पण मला साहेबांना भेटायचंय...

पिसाळ : साहेब आता कुणालाही भेटू शकणार नाहीत.

माणूस : पण मला कोणत्याही परिस्थितीत त्यांना भेटलंचं पाहिजे.

पिसाळ : एकदा सांगितलं ना, साहेब बिझी आहेत... चल उठ!

माणूस : मी काही जास्त वेळ घेणार नाही त्यांचा.

पिसाळ : आता उठतोस बऱ्या बोलानं का हौस आलेय मार खायची? चल, उठ स्साला, उठ!

माणूस : हे बघा मला हात लावू नका. आणि माझ्यावर ताकदीचा प्रयोग करण्याची गरज नाही. मी काही कोणी चोर, दरोडेखोर नाही, समजलं?

पिसाळ : मला शहाणपणा शिकवतोयस व्हय रे? चांगला चपलेनेच झोडतो तुला... उठ, हरामखोर स्साला, उठ!

माणूस : तोंड सांभाळून बोला. शिव्या देण्याचं कारण नाही आणि मला जर मारहाण केलीत तर याद राखून ठेवा, मी थेट इन्स्पेक्टर जनरलकडे तक्रार करीन. वेळ आली तर  सी.एम.पर्यंत जाईन मी, काय समजलात तुम्ही मला?

कांबळे : (डिस्टर्ब होऊन) अरे कोण बोंबलतय रे तिकडे? कसला आरडाओरडा चाललाय? अरे हे पोलिसस्टेशन आहे का मासळीबाजार? पिसाऽऽऽळ...

पिसाळ : (माणसाच्या बखोट्याला धरुन त्याला फरफटत दरवाजापर्यंत आणून) बघा साहेब, अजिबात ऐकत नाही. तुम्हाला भेटायचंय असा हट्ट धरुन बसलाय.

कांबळे : तुला एकदा सांगितलं ना की मला वेळ नाही म्हणून! (माणसाला) आणि काय रे ए बेवड्या, इथं कशाला तडफडायला आलायंस सकाळी-सकाळी? गावातले उकिरडे कमी पडले की काय हुंगायला?

माणूस : (हात जोडून) उकिरड्यावर घाण टाकायची सोय असते, म्हणून गावाचं स्वास्थ्य अबाधित असतं साहेब!

कांबळे : च्यायला, तू तर खरंच डुक्कर-संस्कृतीतला दिसतोयस...

माणूस : एखाद्याची संस्कृती ओळखायची असली ना साहेब तर तो जिथं राहातो तिथले उकिरडे तपासणं गरजेचं असतं. ते काम आमच्यासारखी डुकरं करतात म्हणून तुम्ही माणसांसारखं जगू शकता.

कांबळे : शट्अप ! दारु पिऊन बडबड करायला हे काय बापाचं घर  नाय तुझ्या!(कॉलरला धरुन खेचत ) मला शहाणपणा शिकवतोस काय रे? काय समजतोस तू स्वत:ला, काय समजतोस?

माणूस : ( हात जोडून सस्मित वदनाने)

मी ओळखीले मला पूर्ण,आता कशाला पाहणे मला आरसे! माझ्यापुढे नित्य आत्मनुभूती, पटावे दुजे तर्क आता कसे! मी ईश्वराच्या जगत्कारणाच्या खरी हेतूची पूर्तता मंगल! बोला हवे ते, मला काय त्याचे पुरे जाणितो मीच माझे बळ!

कांबळे : (गोंधळून) काय म्हणायचंय तुला नेमकं?

माणूस : ही कविता रेव्हरंड नारायण वामन टिळक यांची आहे. मंदारमाला अक्षरगण वृत्तात बांधलेली. या वृत्तात एकूण बावीस अक्षरं येतात. ४ थ्या १० व्या आणि १६व्या अक्षरावर यती येतो.

कांबळे : हे व्याकरण मला कशासाठी शिकवतोहेस तू?

माणूस  : मी दारु प्यायलेला असलो तरी पूर्णपणे शुद्धीवर आहे एवढंच आपल्या निदर्शनास आणायचंय मला...

कांबळे : ओ, आय सी! (पिसाळला) तू इथं उभा राहून काय करतोहेस? जा आणि चहा पाठवून दे लवकर.  (पिसाळ "यस सर" म्हणत सॅल्यूट ठोकून निघून जातो.)

माणूस : (हात जोडून) माझ्या एका प्रश्नाचं उत्तर दिलंत तर फार उपकार होतील साहेब.

कांबळे : कोणता प्रश्न?

माणूस :  बाहेर पाटी वाचली 'सयाजीराव कांबळे' पोलिस निरीक्षक. आपणच का ते?

कांबळे : तुला शंका येण्याचं कारण?

माणूस : कारण आहे म्हणून विचारलं साहेब...

कांबळे : हां, मीच तो सयाजीराव कांबळे!

माणूस : 'मीच तो' म्हणजे काही वर्षांपूर्वी महाराष्ट्रभर गाजलेल्या विद्या सडोलीकर खून खटल्याशी संबंधित सयाजीराव कांबळे आपणच?

कांबळे : तुला काय करायच्यात त्या नसत्या चौकश्या?

माणूस : नाही, चौकशीची मला काही हौस नाही पण इथं आलो आणि बाहेरची पाटी वाचून क्षणभर सुन्न झालो... म्हणजे काय एकेक योगायोग असतात पाहा...

कांबळे : हे बघ, तुझी ती फालतू बडबड बंद कर आणि काय काम आहे ते चट्कन सांगून मोकळा हो. मला वेळ नाही फुकट घालवायला.

माणूस : काम तर मी सांगणार आहेच पण आपण जर आधी ते सयाजीराव कांबळे म्हणजे कोण हे सांगितलंत तर बरं होईल साहेब, कारण तुमच्या या उत्तरावर माझ्या तक्रारीची पुढची दिशा अवलंबून आहे.

कांबळे : स्पष्टपणे का बोलत नाहीस तू?

माणूस : विद्या सडोलीकर खून प्रकरणी तोंड बंद ठेवावं म्हणून दोन लाख रुपये खाल्ल्याचा आरोप आपणावर ठेवण्यात आला होता, हे खरं आहे?

कांबळे : माझ्यावर तो सिद्ध होऊ शकला नाही. कोर्टानं निर्दोष सोडलय मला.

माणूस : म्हणजे आपणच ते!

कांबळे : पण तुला काय करायचंय त्याच्याशी?

माणूस : आपण खरंच निर्दोष आहोत असं वाटतं तुम्हाला?

कांबळे : मी धुतल्या तांदळासारखा स्वच्छ आहे. (एकदम उसळत) पण मला हे विचारणारा तू कोण? तोंड काळं कर येथून, गेट आऊट... आय सेड, गेट आऊट! (फरफटत नेऊ लागतात) स्साला डोकं खातोय सकाळी-सकाळी!

माणूस : आपला काही तरी गैरसमज झालाय साहेब. मी काही तुमचं डोकं वगैरे खायला आलेला नाही. मला काय म्हणायचं आहे ते तुम्ही ऐकूनसुद्धा घेतलेलं नाही नीट.

कांबळे : मला तुझं काहीही ऐकायचं नाही. तू आधी चालता हो येथून, क्षणभरही थांबू नकोस इथं!

माणूस : मला तुम्ही हाकलून लावाल साहेब पण  पश्चाताप होईल नंतर तुम्हाला, कारण मी इथं आलोय ते तुमच्याच फायद्याचं प्रजोजल घेऊन...

कांबळे : माझा फायदा व्हावा असं वाटणारा तू कोण?

माणूस : सांगतो साहेब पण तुमचा राग गेलेला दिसत नाही अजून. तसं पाहिलं तर तुम्ही रागावलात ते अगदी स्वाभाविक होतं. मला ते आवडलं. तुम्ही निर्दोष आहात हे तुमच्या रागावण्यातून नकळत दाखवून दिलंत तुम्ही.

कांबळे : मी निर्दोष आहे हे कोर्टानं मान्य केलंय. तिथं मला तुझ्यासारख्या फडतूस माणसाचं सर्टिफिकेट नको!

माणूस : नाही साहेब, आपण निर्दोष सुटलात हे खरंच. पण त्या प्रकरणात सतत चार-पाच वर्ष तुमची जी बदनामी होत राहिली आणि त्यामुळं तुम्हाला जो मन:स्ताप झाला तो पूर्ण भरुन निघाला असं खरंच कधी वाटलं का तुम्हाला?

कांबळे : मी निर्दोष सुटल्याची बातमी सर्व पेपरातून प्रसिद्ध झाली होती.

माणूस : त्या चार ओळींच्या बातमीमुळं आपल्यावर झालेल्या अन्यायाची भरपाई झाली असं वाटत असेल तुम्हाला तर तुम्ही स्वत:ची फसवणूक करताय हे लक्षात घ्या साहेब... मला माहीत आहे, त्या अपमानाचं दुःख खोलवर काळजात जिवंत आहे अजून तुमच्या. तो अपमान भरुन काढावा, लोकांचा  विश्वास पुन्हा एकदा संपादन करावा अशी एक प्रखर जळती इच्छा सोबत घेऊन जगताय तुम्ही, खरंय ना?

कांबळे : तू हे सगळं कशासाठी विचारतोहेस मला?

माणूस : त्या घोर मनःस्तापासून तुमची सुटका होईल अशी एक संधी तुमच्यासाठी घेऊन आलोय मी.

कांबळे : कसली संधी?

माणूस : शेवंताला शोधून काढायची!

कांबळे : शेवंताला शोधून काढायची? कोण-कुठली शेवंता? काय झालं तिला नेमकं?

माणूस : हे सर्व आपणच शोधूनच काढायचंय साहेब.

कांबळे : नक्की काय म्हणायचंय तुला?

माणूस : मला फक्त एवढच माहीत आहे की 'शेवंता जित्ती हाय!'... ह्या एवढ्या एका धाग्यावरुन तुम्ही तिला शोधून काढायचं आहे.

कांबळे : (सूक्ष्मसे बदलत) नाव काय तुझं?

माणूस : माझं नाव काहीही असू शकतं. उदाहरणार्थ सोमाजी गोमाजी कापसे किंवा दगडू धोंडू फतरे... काय फरक पडणार आहे त्यामुळं?

कांबळे : हे पोलिस स्टेशन आहे इथं असं शेंडाबुडखा नसलेल्या बोलण्याला काही अर्थ नसतो. प्रत्येक गोष्टीला पुरावा लागतो इथं.

माणूस : मी स्वतः एक जिवंत, बोलता-चालता माणूस समोर उभा असताना आणखी कोणता पुरावा पाहिजे?

कांबळे : वेळ आली तर तू जिवंत आहेस याचासुद्धा पुरावा सादर करावा लागेल.

माणूस : साक्षीपुरावे आणि कायद्याच्या किचकट फायलीत अडकून पडलात तर सत्यापासून नेहमी दूर जात राहाल साहेब... तुमच्या त्या लाल फितीच्या कारभारात सत्य हे नेहमी घुसमटून जातं, त्याला मोकळ्या मैदानात आणून जाणून घेण्यातच खरा पुरुषार्थ असतो... बोला, आहे तयारी? शेवंताला शोधून काढण्याच्या कामगिरीतील हे पहिलं पाऊल समजा. तुम्ही मला नाव-गाव काही विचारायचं नाही. त्याला तसा काही अर्थसुद्धा नाही... आजवर मी आयुष्यात कधी कुणासमोर झुकलो नाही पण म्हणाल तर दंडवत घालतो तुम्हाला. शेवंताला शोधून काढा साहेब...प्लीज, शेवंताला शोधून काढा!

कांबळे : शेवंता तुझी कोण?

माणूस : कुणीही नाही.

कां : आँ?

माणूस : हो साहेब, ती माझी कुणीही नाही. इतकंच काय पण अद्याप मी तिला पाहिलेलं सुद्धा नाही.

कांबळे : मग तिला शोधून काढण्यासाठी इतका आटापिटा कशाला करतोयंस तू?

माणूस : म्हणजे ज्यांचं ह्या जगात कुणीच नाही त्यांनी आपल्यावर झालेल्या अन्यायाविरुद्ध दाद मागायला जायचं नाही असं म्हणायचंय का तुम्हांला? शेवंतावर अन्याय झालाय साहेब आणि तिच्या बाजूनं उभा राहू शकेल असा दुसरा कोणीही माणूस दिसत नाही मला तुमच्याशिवाय! तुम्ही तिला शोधून काढा, प्लीज....

कांबळे : तुझ्या नादाला लागलो तर वेड लागेल मला!

माणूस : तसं जर झालं तर त्या क्षणापासून आपला भाग्योदय सुरु झाला असं समजा साहेब, कारण वेडा माणूस हा निरिच्छ आणि निर्भय असतो... अशी कितीशी माणसं आहेत हल्ली पोलिसखात्यात?

कांबळे : (फोनकडे वळत) वेड्यांच्या इस्पितळात भरती व्हायचं सोडून पोलिस स्टेशनात आलाहेस तू. ॲम्ब्युलन्स मागवून घेतो लगेच. (फोन फिरवत) म्हणे 'शेवंता जित्ती हाय!' तिला शोधून काढा. ती कोण कुठली हे माहीत नाही. तक्रार करणाराला स्वत:च नाव-गाव ठावूक नाही. वैताग स्साला!

माणूस : (त्यांच्याजवळ जात) शांतपणे विचार करा साहेब. वस्तुस्थिती चमत्कारिक आहे असं वाटणारच तुम्हाला पण चमत्कारिक असली तरी ती वस्तुस्थिती आहे हे लक्षात घ्या.

कांबळे : म्हणजे काय करू?

माणूस : रीतसर तक्रार आणि आवश्यक ते धागेदोरे हाती असले तर शेंबडा पोरगासुद्धा तपास करु शकेल. पण केवळ 'शेवंता जित्ती हाय' या एका वाक्याच्या आधारे तिचा शोध लावणं ह्यात खरं आव्हान आहे. एवढ्याश्या धाग्यावरुन शोधून काढली तुम्ही तिला तर लोक उदो उदो करतील तुमचा. डोक्यावर घेऊन नाचतील. कदाचित राष्ट्रपतीपदकसुद्धा मिळेल. आणि मुख्य म्हणजे विद्या सडोलीकर खूप प्रकरणात तुमची जी मानहानी झाली ती भरुन निघेल. भूतकाळ लख्ख होऊन जाईल तुमचा...मला तुम्ही वेडा म्हणालात तरी हरकत नाही पण एका वेड्या माणसाच्या तक्रारीची शहाणी दखल घेण्याचा वेडेपणा तुम्ही कराच साहेब. शेवंताला शोधून काढा,प्लीज...

कांबळे : (फोनचा विचार बदलत) तू ही तक्रार घेऊन इथंच, माझ्याकडंच का आलास?

माणूस : दुसरं काही नाही 'जेन्युईन कोइन्सिडन्स'! गाडी जिथं थांबली तिथं उतरलो आणि पहिलं जे पोलिस स्टेशन दिसलं तिथं आत शिरलो. तुम्हाला कदाचित आश्चर्य वाटेल पण या गावाचं नावसुद्धा माहीत नाही अजून मला... बाहेर पाटीवर तुमचं नाव वाचलं आणि एक प्रकारचं समाधान अंगभर पाझरत गेलं... वाटलं, परमेश्वरानंच आपल्याला इथं आणलंय आणि तुमच्या मदतीनं शेवंताला शोधून काढण्याची कामगिरी करुन घेतोय तो आपल्याकडून!

कांबळे : शेवंता जिवंत आहे हे तुला कसं समजलं?

माणूस : तसं मी एका ठिकाणी वाचलं.

कांबळे : कुठं वाचलंस?

माणूस : (गप्प)

कांबळे : ऐकू आलं ना, कुठं वाचलंस तसं?

माणूस : एका संडासात लिहिलेलं होतं तसं!

कांबळे : संडासात!

माणूस : चमत्कारिक वाटलं ना? लहानपणापासून उकिरडे हुंगत फिरायची सवय असल्यामुळंच चट्कन लक्षात आलं ते माझ्या!

कांबळे : नेमकं काय लिहिलं होतं तिथं?

माणूस : 'शेवंता जित्ती हाय' एवढं एकच वाक्य! ते दोनतीनदा वाचलं आणि मग एखाद्या असाध्य रोगाचा विषाणू मेंदूत शिरावा तसा अस्वस्थ झालो मी. ही शेवंता कोण? कुठली? काय झालं असेल तिला? ती ‘जित्ती हाय’ म्हणजे तिला कोणी मारण्याचा प्रयत्न केला का? असं कोणतं रहस्य होतं तिच्याजवळ की ज्यामुळं लोकांनी तिच्या जिवावर उठावं? असंख्य प्रश्नांचं मोहोळ उठलं मनात... विशेष म्हणजे 'शेवंता' या नावानं मनात फार मोठी करुणा निर्माण केली. एक अडाणी, असहाय, गरीब बाई आपल्या सद्सद्विवेकबुद्धीला साद घालतेय, मला सोडवा, मला वाचवा-असा धावा करतेय असं वटायला लागलं. तीन शब्दांच्या या छोट्याशा वाक्यामागं काही तरी भयानक, स्फोटक असं कारस्थान असावं असंही वाटायला लागलं आणि म्हणून हे काम पोलिसांकडं सोपवावं असं ठरवून मी इथं आलो साहेब.

कांबळे : तुझ्यासोबत मूर्खपणा करायचाच असं ठरवलं तर  आपल्याला ते वाक्य आणि त्या शौचालयाच्या परिसराची  तपासणी करावी लागेल आधी.

माणूस :  फार खडतर कामगिरी आहे ती साहेब!

कांबळे : का?

माणूस : कारण तो संडास रेल्वेच्या डब्यातील होता.

कांबळे : काय?

माणूस : होय साहेब. 'महाराष्ट्र एक्सप्रेस'नं प्रवासाला निघालो होतो. वाटेत कधीतरी लघवीला गेलो तर ते वाक्य दिसलं मला...

कांबळे : (काय बोलावं त्याला कळत नाही)

माणूस : काम किचकट आहे पण असं काम करण्यातच खरं आव्हान असतं याची कल्पना आहे तुम्हांला...

कांबळे : शेवंताला शोधून काढली तर त्यामुळं तुझा काय फायदा होणार आहे?

माणूस : फायद्यापेक्षा नुकसान जास्त तापदायक होणार आहे साहेब, कारण एका साध्या प्रकणाची तड लावू शकलो नाही म्हणून माझं मन मला आयुष्यभर खात राहील.

कांबळे : म्हणजे तुझ्या मन:स्वास्थ्यासाठी तू माझा वापर करून घेतोहेस तर?

माणूस : नाही, नाही, नाही! तसं मुळीच नाही. तिला शोधून काढली नाहीत तर नाव कमवण्याची एक चांगली संधी हुकली याचा तुम्हालाही पश्चाताप होत राहील आयुष्यभर... आणि माझ्यापेक्षा तुमच्या मन:स्वास्थ्याची अधिक काळजी वाटते मला कारण विद्या सडोलीकर प्रकरणाच्या तापातून बाहेर पडण्यासाठी इतकी उत्तम संधी परत कधी मिळणार नाही तुम्हाला हे लक्षात घ्या साहेब!

कांबळे : माझी एवढी काळजी का वाटते रे तुला?

माणूस : मला शेवंताची काळजी का? या प्रश्नाइतकाच निरर्थक प्रश्न आहे हा! 'शेवंता जित्ती हाय' हे वाक्य म्हणजे एका गरीब, भोळ्या-भाबड्या, अडाणी बाईचा क्षीण चित्कार असून तो कानी पडताच, ज्याची सद्सद्विवेकबुद्धी शाबूत आहे असा कोणताही माणूस अस्वस्थ झाल्याशिवाय राहणार नाही. असा माणूस तुमच्यातही दिसतोय मला. तुम्हालाही एक हळुवार मन आहे, संवेदनशील काळीज आहे, भावना आहेत हे या निमित्ताने जगाला दाखवून द्या. तेच तुमचं खरं कर्तृत्व ठरेल. वाटल्यास पाय धरतो मी तुमचे पण शेवंताला शोधून काढा. (माणूस कांबळेंच्या पायावर लोटांगण घालतो. कांबळे त्याला दोन्ही हातांना धरून वर उठवतात. दारूचा भपकारा आल्यामुळे मान फिरवतात)

कांबळे : शी... शी... वासानंच ओकारी येतेय नुसती. कुठं शेण खायला गेला होतास सकाळी सकाळी?

माणूस : (निर्मळ हसत)  काय साहेब?

कांबळे : नाऊ आय गॉट इट. सतत दारूच्या नशेत राहिल्यामुळे बुद्धी भ्रष्ट झालीय तुझी आणि काहीतरीच बरळतोहेस तू. आय हेट ड्रंकार्डस् लाईक यू...

माणूस : मी दारु प्यायलोय साहेब आणि ते मी मघाशीच मान्य केलंय. पण दारुमुळं माझी बुद्धी भ्रष्ट झालीय किंवा मी बरळतोय हे आरोप चुकीचे आहेत तुमचे... आणि दारु पिणाऱ्या सर्वच माणसांचा तिरस्कार करावा अशातलाही भाग नाही हे लक्षात घ्या तुम्ही!

कांबळे : त्यांचा सत्कार करत फिरावं असं म्हणायचंय का तुझं?

माणूस : एखादा पिणारा माणूस दारुला प्रतिष्ठा मिळवून देत असेल तर त्याचा सत्कार करायलाही काय हरकत आहे? ज्यांना दारु कशी प्यावी हे माहीत नाही ना साहेब त्यांनीच दारुला बदनाम केलय आपल्याकडं... दारु पिण्याची त्यांची पद्धत एवढी चुकीची असते की हे लोक अमृताच्या ताटात नरोटी ठेवणारे आहेत असंच म्हणावं लागतं... कुडचाभर दारु पोटात जाताच जो लोळायला आणि बडबडायला लागतो तो आयुष्यभर दरूला बदनाम करत राहतो. पहिल्या फेरीतच धरणीला पाठ टेकणारे असे असंख्य गांडू-शौकीन आपल्याकडं गल्लोगल्ली पडलेले आहेत साहेब...

कांबळे : दारू कशी प्यावी याचे कोचिंग क्लासेस काढायचे का त्यांच्यासाठी सरकारनं?

माणूस : अगदी तसंच नाही पण या दुर्दैवी परिस्थितीत सुधारणा कशी घडवून आणता येईल याचा प्रत्येक पिणाऱ्यानं विचार करायला हवा. मी स्वतः आजवर अनेकदा अनेक ठिकाणी अनेक प्रकारची दारू प्यायलो असेन पण ती मला कधी चढली किंवा माझा पाय कधी वाकडा पडला असं एकही उदाहरण दाखविता येणार नाही मला... पाप म्हणून आपण एखादी गोष्ट मान्य करणार असलो ना साहेब, तर जिच्या प्राशनानं काही क्षणातच आपली पेशीन् पेशी मोकळी होते आणि मेंदूत नवनव्या अद्भूत विश्वांची महाद्वारं खुली होतात अशी दारु पिऊन धिंगाणा घालणं यालाच खरं पाप म्हटलं पाहिजे!

कांबळे :  म्हणजे आता दारु प्यायल्यामुळं असंच एक काल्पनिक महाद्वार उघडलं गेलंय तुझ्या मेंदूत- 'शेवंता' नावाचं...

माणूस : नाही नाही साहेब; शेवंता जित्ती हाय हे जितकं सत्य आहे तितकंच मी दारूच्या अमलाखाली नाही हे सत्य आहे. वाटल्यास आत्ता या क्षणी तुम्ही माझी कोणतीही परीक्षा घेऊ शकता. कोणताही प्रश्न विचारा मला, त्याचं अचूक उत्तर देईन मी. तुम्ही म्हणत असाल तर आत्ता मोरोपंतांची केकावली जशीच्या तशी म्हणून दाखवतो. ऐकायचीय? (उत्तराची वाट न पाहता सुरूवात करतो) कृतांतकटकामलध्वजजरा दिसो लागली...पुरस्सर गदासवे झगडिता तनू...

कांबळे : (त्याला थांबवत) रेल्वेकडं हजारो मैल लांबीचे रस्ते आहेत. शेकडो गाड्या, अगणित डबे आणि असंख्य स्टेशनं आहेत... त्यातून नेमका तोच डबा शोधून कसा काढायचा? आणि तो सापडलाच तरी ती घटना जिथं घडली ते गाव आणि ती शेवंता नावाची बाई कशी काय शोधून काढायची? धुक्यात शिल्प कोरण्याइतकी अशक्यप्राय गोष्ट आहे ही.. आपण दारूच्या अमलाखाली नाही असं तू म्हणतोस मग 'शेवंता जित्ती हाय' या एका वाक्यावरून तपासाला सुरुवात कशी करायची ते सांगू शकशील का तू?

माणूस : आता आपण विचारताच आहात तर मी माझ्या परीनं प्रयत्न करून बघतो साहेब... बघा हं, आता प्रथम आपण 'शेवंता जित्ती हाय' हे वाक्य तपासून पाहू... एक म्हणजे शेवंता हे नाव आजकाल खेड्यातच ऐकायला मिळतं आपल्याला. शिवाय 'जित्ती हाय' हा शब्दप्रयोग- सुद्धा ग्रामीण आणि खास महाराष्ट्रातील आहे हे पण लक्षात येतं... नंबर दोन : हे वाक्य जर एखाद्या तरुणानं लिहिलं असतं तर 'शेवंता जिवंत आहे' असं प्रमाणभाषेत लिहिलं असतं. याचा अर्थ 'शेवंता जित्ती हाय' हा शब्दप्रयोग एखाद्या कमी शिकलेल्या प्रौढ पुरूषाचा किंवा स्त्रीचा असणार असं आपण गृहीत धरू शकतो. नंबर तीन : एखादी स्त्री रेल्वेच्या डब्यातील संडासात जाऊन असं काही लिहील, हे आपल्याकडील ‘मुतारी वाङ्मया’च्या उज्ज्वल परंपरेतील पुरूषांची मक्तेदारी लक्षात घेता शक्य वाटत नाही... त्यामुळे हे वाक्य एखाद्या कमी शिकलेल्या प्रौढ पुरूषानंच लिहिलं असावं असा निष्कर्ष काढता येतो.

कांबळे : पण हे त्यानं संडासातच जाऊन का लिहिलं असावं? आणि तेही रेल्वेच्या?

माणूस :  याचं कारण, त्याच्या मनात भीती असणार. आपल्याला कुणी पाहू नये असं त्याला वाटलं असणार. त्याच्यावर असणाऱ्या भीतीच्या दडपणाची तीव्रताही यावरून आपल्या लक्षात येते. त्याला असं वाटलं असेल की हा डबा देशभर प्रवास करत राहील. हजारो प्रवासी त्यातून प्रवास करत राहतील. अनेक जण ते वाक्य वाचतील. ज्याची सद्सद्विवेकबुद्धी जागृत आहे असा एकतरी माणूस त्यात असेल...त्या वाक्याची ठिणगी त्याच्या अंत:करणात पडेल आणि मग शेवंताला शोधून काढण्यासाठी तो आपल्या आयुष्याला वणवा लावून घेईल...

कांबळे : कल्पनाशक्ती फार अचाट आहे तुझी.

माणूस : कल्पना म्हणजे शक्यतेवरचं एक भ्रामक फोलपट असतं साहेब. मी फक्त तपासाची एक दिशा सुचवतोय तुम्हांला. कदाचित दुसऱ्या एखाद्या माणसाला यापेक्षा अगदी भिन्न स्वरूपाची कल्पनादेखील सुचू शकेल.

कांबळे : उदाहरणार्थ?

माणूस : उदाहरणार्थ 'शेवंता जित्ती हाय' हा एखाद्या सांकेतिक भाषेतील संदेश असू शकतो. त्याचा संबंध राष्ट्रपतींच्या हत्येच्या कटाशीही जोडला जाऊ शकतो... कदाचित, शेवंताचा योग्य तो बंदोबस्त करावा असं एखाद्यानं आपल्या गुंड बॉसला सूचित केलेलं असू शकतं... किंवा कदाचित तिचा आधीच खून करण्यात आलेला असेल पण ती मेली नाही असं भासविण्यासाठी, म्हणजे संबंधितांच्या डोळ्यात धूळ फेकण्यासाठी मुद्दाम तसं लिहून ठेवलेलं असू शकतं...

कांबळे : किंवा कदाचित असंही असू शकेल की, एखाद्या चांगल्या-सुसंस्कृत माणसानं काही विशिष्ट कारणावरून शेवंताला ठार मारली असेल आणि पोलिसांच्या डोळ्यांत धूळ फेकण्यासाठी मुद्दाम ती 'जित्ती हाय' असं ग्रामीण ढंगात लिहून ठेवलं असेल...

माणूस : (खुषीनं) सहज शक्य आहे!

कांबळे : आणि मग कदाचित ती बाब पोलिसांच्या निदर्शनास आणून देण्यासाठी तो माणूस स्वतःच फाजील आत्मविश्वासानं प्रयत्न करीत असेल...

माणूस : म... म्हणजे... काय म्हणायचंय तुम्हांला?

कांबळे : ( माणसाची गचांडी धरून पोटात ढोपर मारत) यू रास्कल! पोलिसांना इतकं मूर्ख समजतोस तू? (ते मारत आहेत, माणूस कळवळत आहे) बोल शेवंता कुठाय?

माणूस : मला माहीत नाही साहेब, उलट मीच तुम्हांला विचारण्यासाठी आलोय इथं.

कांबळे : बोल, काय केलंस तिचं?

माणूस : मी काय करणार साहेब? मी तर तिला अजून पाहिलेलीसुद्धा नाही.

कांबळे : बोल, कशी मारलीस तिला? का मारलीस? खरं बोल नाहीतर तुझी चामडी सोलून कुत्र्यासमोर टाकतो साल्या! (ते त्याला ओढत कस्टडीकडे नेऊ लागतात तो 'मला काही माहीत नाही, मी तिला काहीही केलं नाही, मी तिला बघितलेली सुद्धा नाही' असं म्हणत राहतो. कांबळे त्याला आत नेतात आणि मारहाण सुरूच ठेवतात. काही क्षणांनी फोनची रिंग वाजू लागते. बाहेरून कॉन्स्टेबल पिसाळ धावत येतो, त्याच्या हातात चहाचा ग्लास. ग्लास टेबलावर ठेवून पिसाळ फोन उचलतो.)

पिसाळ : नमस्कार, कॉन्स्टेबल पिसाळ बोलतोय... हां... हां... आपण कोण बोलताय? (कडक सॅल्यूट मारत) जयहिंद सर! हो आहेत...देतो... देतो सर... (कांबळेंना) साहेब, गोन्सालवीससाहेबांचा फोन...

कांबळे : ( माणसाला सोडून बाहेर येत फोन घेतात) जयहिंद सर! इन्स्पेक्टर कांबळे स्पीकिंग सर, येस सर... आपला फोन आला होता एवढं समजलं पण लोकेशन माहीत नव्हतं त्यामुळे मी फोन करू शकलो नाही सर... काय विशेष सर?...अच्छा... अच्छा... ओ आय सी.. कधीची घटना सर? आय सी... व्हाट अ कोइन्सिडन्स सर! यू विल नॉट बिलिव्ह मी इफ आय टेल यू समथिंग सर... आपण असं म्हणतो ना की प्रत्येक गुन्हेगार गुन्हा करून जाताना

तिथं आपलं व्हिजिटिंग कार्ड ठेवून जातो... पण इथं तर त्याही पलीकडचा अनुभव आलाय मला... गुन्हेगार स्वतः आपलं व्हिजिटिंग कार्ड घेऊन भेटायला आलाय!येस सर... येस सर... आयॅम नॉट शुअर बट आय विल फाईंड द ट्रूथ व्हेरी सून... आय विल इन्फॉर्म यू ॲज अर्ली ॲज पॉसीबल ....शुअर्ली सर... ओके सर... थँक्यू सर ... (फोन ठेवतात. नव्या त्वेषानं कस्टडीतील माणसाकडे पाहात कमरेचा पट्टा सोडतात आणि कस्टडीकडे चालू लागतात. अंधार होऊ लागतो. अंधारातून मारहाणीचे आवाज.गडद अंधार. काही क्षणांची नीरव शांतता.)

(काही क्षणांनंतर कस्टडीवरचा प्रकाश उजळतो. पाय पोटाशी घेऊन कट्टयावर शांतपणे झोपलेला माणूस दिसतो. हळूहळू जनरल लाईट येतो. पिसाळ बाकड्यावर  बसल्या बसल्या डुलक्या काढतोय. कांबळेंच्या टेबलावर आता पाण्याने भरलेला काचेचा ग्लास. त्याचे अस्तित्व जाणवावे. बाहेरून सयाजीराव कांबळेंचा आवाज येतो...)

कांबळे : अरे कोणी आहे कारे ऑफिसामध्ये? शिंदेऽ पिसाऽळ, साळुंखेऽऽ गेले कुठे सर्वजण मरायला? उद्या चोरांनी सर्व पोलिसस्टेशन लुटून नेलं तरी पत्ता लागायचा नाही कुणाला. सगळे एकजात कामचुकार लेकाचे.(येत) पिसाळ SSS

पिसाळ : (खाड्कन जागा होऊन सॅल्यूट मारत) येस सर ...

कांबळे : अरे गेले कुठं सर्व जण तडफडायला?

पिसाळ : (भाबडेपणाने) मला माहीत नाही साहेब, मी झोपलो होतो.

कांबळे : ओहोहोहो ! ड्यूटीवर झोपा काढतोस आणि पुन्हा  वर तोंड करून ते मला सांगतोस? ह्या तुझ्या महान प्रमाणिकपणाबद्दल काय बक्षीस देऊ तुला? सस्पेंड करू की डिसमिस करून टाकू?

पिसाळ : (ओशाळत) माफ करा साहेब, चूक झाली.

कांबळे : काय माफ करा? तो माणूस पळून गेला तर बाहेर अब्रूचे धिंडवडे काढील माझ्या... कळतंय ना तुला?

पिसाळ : (केवीलवाणा) माझं बारकाईनं लक्ष होतं साहेब, इथून कुठंही हललो नाही अजिबात. आता झोपलाय तो म्हणून मी जरा निवांतपणे बसलो होतो इतकंच!

कांबळे : (माणसाकडे पाहात) बुटाचे सोल फाटेपर्यंत तुडवलाय साल्याला. रात्राभर बोंबलत बसला असेल आणि तू म्हणतोस झोपलाय?

पिसाळ : अगदी शांतपणे झोपलाय साहेब आणि रात्री घोरतसुद्धा होता...

कांबळे : अस्सं? जेवण दिलं होतंस?

पिसाळ : समोरून थाळी आणली होती पण त्यानं हात नाही लावला.

कांबळे : चहा-पाणी? इतर काही खायला?

पिसाळ : काही नाही साहेब.

कांबळे : बरं, स्वत:हून काही मागितलं होतं त्यानं?

पिसाळ : दारू मागत होता साहेब...

कांबळे : जेवायला देऊ नकोस आणखी दोन दिवस म्हणजे मस्ती उतरेल त्याची... दारू मागतोय भोसडीचा!

पिसाळ : तुम्हांला एक गोष्ट सांगायची होती साहेब...

कांबळे : काय?

पिसाळ : हा माणूस जरा वेगळाच दिसतोय...

कांबळे : म्हणजे कसा?

पिसाळ : सी.आय.डी.चा असावा असं वाटतंय....

कांबळे : शुद्धीवर आहेस का तू?

पिसाळ : तुमचं ते विद्या सडोलीकर प्रकरण सारखं सारखं काढीत होता म्हणून वाटलं मला.

कांबळे : (तापत) मला काहीच अक्कल नाही असं वाटतं का तुला? मला कळत नाही का कोण माणूस काय आहे ते? हे बघ तुला परत एकदा सांगून ठेवतो, यापुढे मला तुझा रिकामचोट सल्ला द्यायचा नाही...

पिसाळ : चुकलं साहेब!

कांबळे : बोच्यावर पाणी घालायला सांगितलं की घालायचं, लोंबतय काय ते विचारायचं?

पिसाळ : (हात जोडत) 'नाही' साहेब.

कांबळे : (शांत होत) बरं कुणाचा काही फोन वगेरे?

पिसाळ : वायरलेस ऑपरेटर येऊन गेला.

कांबळे : काय म्हणत होता?

पिसाळ : तुम्ही काल रात्री कंट्रोलरुमवरनं काही माहिती मागितली होती ना?

कांबळे : हां.. हां.. ती हरवलेल्या व्यक्तीसंबंधी...

पिसाळ : त्यासंबंधी काही तरी मेसेज आहे पण लाईन खराब असल्यामुळे नीट काही समजत नाही म्हणून परत मागवलाय...

कांबळे : बरं बरं... सांगितलेली सर्व तयारी झाली?

पिसाळ :  हो साहेब.

कांबळे : बाटली?

पिसाळ : आणलेय!

कांबळे : आणि त्या डब्या चेक करून ठेवल्यास ना नीट?

पिसाळ : हो साहेब.

कांबळे : व्हेरी गूड!जा आणि उठव त्या हरामखोराला. म्हणावं आरामात झोपा काढायला हे काही तुझ्या बापाचं घर नाही... घोरतोय स्साला!(कस्टडीचा दरवाजा उघडून पिसाळ माणसाला बाहेर काढतो. 'उठ रे बेवड्या... उठ... झोपतोय हरामखोर - उठ, साहेब बोलावताहेत.' असे म्हणत घेऊन येतो.)

कांबळे : कसा काय वाटला आमचा पाहुणचार मिस्टर सोमाजी गोमाजी कापसे? फाजील बुद्धिमत्तेचा ताप आणि दारूची नशा दोन्ही उतरली की नाही एकदम?

माणूस : फाजील बुद्धिमत्तेचा ताप माला कधी चढलाच नाही साहेब. मनात आणलं असतं तर तो चढावा अशी आमच्या घराण्याची ख्याती होती. कारण माझ्या आजोबांनी मुनस्मृती ह्या ग्रंथातील 'मनुस्मृती हा शब्द वगळता तर इतर सर्व माहिती प्रक्षिप्त आहे' असा धक्कादायक युक्तिवाद करून कांची कामकोटीच्या शंकराचार्यांना वादात पराभूत केलं होतं. आणि दारूचं म्हणत असाल तर वारंवार सांगत आलोय आपल्याला की, मदिरादेवी रूसल्यात आमच्यावर, त्यांचं कितीही पान केलं तरी नशा म्हणून चढत नाही. प्रत्यक्ष अनुभव घेऊन बघायचा असेल तर मागवा इथं. तुम्ही सांगाल तितकी पितो आणि एकाही शब्दावर न अडखळता अख्खी भगवद्गीता म्हणून दाखवतो... आहे तयारी?

कांबळे : पोलिसस्टेशनात दारू मागतोहेस, शुद्धीवर आहेस ना नीट?

माणूस : नीट शुद्धीवर आहे म्हणूनच मागतोय साहेब.

कांबळे : मस्ती उतरलेली दिसत नाही तुझी अजून!

माणूस : तुमचा काही तरी गैरसमज झालाय साहेब. मी एक अतिशय नम्र आणि निरूपद्रवी माणूस आहे. मुंगी होऊन साखर खावी हा संदेश आमचा दहा पिढ्या विनातक्रार पाळत आलेल्या आहेत...

कांबळे : तुझ्या या नम्रपणाच्या नाटकाला फसणारा माणूस नाही मी. तुझ्यापेक्षा निर्ढावलेले मोठमोठे गुन्हेगार सरळ केलेत अनेकदा... एकदा तर तुझ्यापेक्षा दहापटींनी सरस अशा एका अट्टल गुन्हेगाराला तपासला होता. माझा दंडुका त्याच्या पाठीवर काड्कन मोडला तेव्हा धडाधडा बोलायला लागला तो!

माणूस : त्यात काय विशेष?

कांबळे : तसं काही विशेष नव्हतं फक्त तो जन्मापासून मुका होता इतकंच! (गडगडाट करीत हसतात.)

माणूस : तात्पर्य काय की तुमच्या या एवढ्या मोठ्या यशस्वी कारकीर्दीचं श्रेय एका क्षुद्र दंडुक्याकडं जातं...

कांबळे : नो नो नो नो माय डियर फ्रेंड, स्वतःच्या सोयीसाठी, चुकीचं तात्पर्य काढू नको तू. माझ्या यशाचं श्रेय हे या दंडुक्यात दडलेलं नसून माझ्या मेहनतीमध्ये, माझ्या प्रामाणिकपणामध्ये, माझ्या लॉयल्टीमध्ये आहे. द मोस्ट ओबिडियंट गव्हर्नमेंट सर्व्हंट... ट्वेंटीफोर अवर्स ऑन ड्यूटी. नोकरीला लागल्यापासून कधी रजासुद्धा घेतल्याचं आठवत नाही नीट ...

माणूस : जरा बारकाईनं आठवण्याचा प्रयत्न केलात, तर नोकरीला लागल्यापासून आजपर्यंत तुम्ही दोनदा दीर्घ स्वरूपाची रजा घेतली होती हे लक्षात येईल तुमच्या...

कांबळे : (त्याचं मनावर न घेता हसत) ओ आय सी... कधी घेतली होती - सांग तरी !

माणूस : विद्या सडोलीकरचा खून झाला तेव्हा पहिल्यांदा आणि त्या प्रकरणातून निर्दोष सुटलात तेव्हा दुसऱ्यांदा!

कांबळे : घेतली असेल...

माणूस : इतकी झटकून टाकण्यासारखी गोष्ट नाही ती. तुमच्यासारख्या एवढ्या मोठ्या कार्यक्षम आणि लॉयल अधिकाऱ्यानं मोठ्या रजेवर जावं याला तसंच काहीतरी खास कारण होतं!

कांबळे : काय कारण होतं?

माणूस : आपण विद्यावर अन्याय केलाय याची तुमच्या सद्सद्विवेकबुद्धीला टोचणी लागली होती म्हणून पहिल्यांदा आणि दोषी असूनही निर्दोष सुटलात म्हणून दुसऱ्यांदा! या दोन्ही प्रसंगात तुम्ही फार अस्वस्थ झाला होता साहेब. तुम्हांला विश्रांतीची गरज होती. विशेषतः मानसिक विश्रांतीची. आणि म्हणून तुम्ही रजा घेऊन थंड हवेच्या ठिकाणी सहलीला गेलात... आठवतंय?

कांबळे : (विचारमग्न)

माणूस : आठवत नसेलच साहेब. कारण अशा वेळी विस्मरणशक्ती अगदी आठवणीने धावून येते मदतीला!

कांबळे : (थोडे चिडत) तुला काय म्हणायचंय? स्पष्टपणे का बोलत नाही तू?

माणूस : विद्या सडोलीकरवर वनखात्याच्या रेस्टहाऊसमध्ये बलात्कार झाला. तेथून धडपडत ती तुमच्याकडे आली पण तुम्ही तिची तक्रार घेतली नाहीत.आयॅम हेल्पलेस असं उत्तर दिलंत, खरंय?

कांबळे : साफ खोटं!

माणूस : बलात्कार प्रकरणात पालकमंत्र्यांचा मुलगा गुंतलाय हे विद्या तुमच्याकडे यायच्या आतच समजलं होतं तुम्हाला. त्यांनी तुमच्यावर दडपण आणलं, दहा लाख रूपये हार्ड कॅश दिली आणि शंभर पात्र सब- इन्स्पेक्टर्सना

डावलून तुम्हांला इन्स्पेक्टरचं प्रमोशन मिळवून दिलं... सहानुभूतीचा हा तुकडा ज्या क्षणी उचललात ना साहेब त्या क्षणापासून तुमचा अध:पात सुरू झाला आणि म्हणूनच तुम्ही स्वतःला जितके समजता तितके ग्रेट राहिलेले नाही आहात.

कांबळे : तुझ्या डोक्यात एका काल्पनिक विश्वाचं महाद्वार उघडलेलं दिसतंय. अरे कोर्टानं मला निर्दोष सोडलंय.

माणूस : निर्दोष! इन द कोर्ट ऑफ लॉ! (तुच्छतेनं हसतो)

कांबळे : न्यायालयाचा अवमान करतोहेस तू!

माणूस : खरा न्याय फक्त एकाच कोर्टात मिळतो साहेब आणि ते कोर्ट असतं आपल्या मनात. तिथं आपण स्वतःच वादी, स्वत:च प्रतिवादी आणि स्वत:च न्यायाधीशही असतो! मात्र मनातल्या कोर्टाची एक खास खासियत असते, तिथं खाडाखोड केलेलं रेकॉर्ड स्वीकारलं जात नाही.

कांबळे : खाडाखोड केलेलं रेकॉर्ड? काय म्हणायचंय तुला?

माणूस : तो उकिरडा मी खरोखरच उपसावा अशी इच्छा आहे का तुमची? विद्यावर बलात्कार झाला आणि नंतर तुमच्या पोलीस स्टेशनातून घरी जात असताना तिचा खूनही झाला. पण हे सगळं बाजूला राहिलं आणि तिनं गाडीखाली  उडी मारून आत्महत्या केली असंच कोर्टात सिद्ध झालं ना? तिच्यावर झालेल्या बलात्कारापेक्षा तिची खरी विटंबना तुमच्या कागदपत्रांनी केली साहेब.

कांबळे : (कठोर होत) विद्या सडोलीकर तुझी कोण होती?

माणूस : शेवंता जशी माझी कुणीच नाही त्याप्रमाणेच विद्याही माझी कुणी लागत नव्हती.

कांबळे : विद्याशी तुझं काहीही नातं नव्हतं?

माणूस : मी खोटं बोलत नाही साहेब.

कांबळे : शेवंताशीही तुझं काही नातं नाही?

माणूस : काहीही नाही.

कांबळे : मग हे उपद्व्याप करण्याचं कारण तरी काय तुला?

माणूस : आयुष्यात फक्त दोन गोष्टींशी तडजोड करू शकत नाही मी. अन्याय सहन करू शकत नाही आणि दारूचा मोह टाळू शकत नाही.

कांबळे : आय सी,ओके! (विचारपूर्वक) दारू मागवू तुझ्यासाठी?

माणूस : हा प्रश्न विचारून आपण माझा जो बहुमान केलात त्याबद्दल आभारी आहे. अगदी लवकर मागवा. कालपासून थेंब नाही पोटात. पण हे बघा, माझ्यावर उपकार म्हणून नको तर माझ्या न्याय्य हक्काचा सन्मान म्हणून मागवा.

कांबळे : हक्क? तो कसा काय?

माणूस : शेवंताला शोधून काढून आपला भूतकाळ स्वच्छ करण्याची अभूतपूर्व संधी दिलीय की नाही मी तुम्हांला?

कांबळे : माझा भूतकाळ अस्वच्छ आहे हे इतक्या ठामपणे तू कोणत्या आधारावर सांगतोहेस तू?

माणूस : मी तसं गृहीत धरलंय असं समजा क्षणभर.आणि असं गृहीत धरण्यामुळं तुमचं काही नुकसान नाही, झालाच तर फायदा होईल हेही लक्षात घ्या!

कांबळे : म्हणजे?

माणूस : तुम्ही निरपराध असाल तर त्या प्रकरणात झालेली मानहानी भरून काढणं ही तुमची अंतरिक गरज आहे आणि तुम्ही विद्यावर अन्याय केला हे खरं असेल तर शेवंताला न्याय देऊ त्याचं परिमार्जन करणे हे तुमचं कर्तव्य आहे. दोन्हीही गोष्टी तुमच्या हिताच्या आहेत... येतंय ना लक्षात?

कांबळे : थोडं थोडं लक्षात यायला लागलंय आता. पण तुझ्याबाबत मीही एक गोष्ट गृहीत धरलेली आहे.

माणूस : कोणती?

कांबळे : येईलच तुझ्या ही लक्षात आता... (हाक मारत) पिसाळ ऽऽऽ

पिसाळ : येस सर?

कांबळे : ते सामान घे बरं इकडं.

पिसाळ : देतो साहेब. (असं म्हणून बाजूला ठेवलेल्या एका ट्रंकेतून कैद्यांना बांधण्याची दोरी काढतो. मग ते दोघेही मिळून माणसाचे हात बांधतात. दोरखंडाची दुसरी टोकं पार्टिशनवरच्या हुकात अडकवतात. माणूस आता हात वर टांगून बांधलेल्या स्थितीत. ह्या अनपेक्षित कृतीमुळे तो अचंबित झालेला आहे. त्याला बांधणे चालू असताना त्याची बडबड आणि कांबळे यांचे हसणे सुरू...)

माणूस : हे हे काय करताय साहेब? मला बांधताय कशासाठी? हा तर माझ्यावर अन्याय करताय तुम्ही... काय चालवलंय काय तुम्ही? चोर सोडून संन्याशालाच फाशी द्यायला निघालाय... माझ्या भावनांशी क्रूरपणे खेळताय तुम्ही... दारू मागवू का असं विचारलंत आणि ती मागवणं तर बाजूलाच वर मला डांबून ठेवताय तुम्ही... मी एक गरीब पापभिरू माणूस आहे साहेब... एक तक्रार घेऊन आलो तुमच्याकडे हा काही माझा गुन्हा होऊ शकत नाही साहेब...

कांबळे : आता जर तू जास्त शहाणपणा करणार नसशील आणि माझ्या प्रश्नांची निमूटपणं उत्तर देणार असशील तर तुझ्यासाठी दारु मागवण्याचा नक्की विचार करीन मी.

माणूस : त्यात विचार काय करायचा साहेब? कालपासून पोटात दारूचा थेंब नाही. तुम्हांला जसं पाणी लागतं, चहा-नाश्ता-जेवण लागतं त्याप्रमाणेच मला दारु लागते... आणि मी काही नशा येण्यासाठी पीत नाही ती तर माझ्या देहस्वभावाची एक नैसर्गिक गरज म्हणून पीत असतो. तुम्ही मला आता ताबडतोब दारु दिली पाहिजे आणि ती सुद्धा प्रेमादरपूर्वक!

कांबळे : (खाड्कन माणसाच्या थोबाडीत मारत) मादरचोद स्साला! तू स्वतः ला पौरस समजत असशील पण मी सिकंदर नाही हे लक्षात ठेव! हे

माणूस : ( गाल चोळत रोखून बघत) पौरसाला कैद करून सिकंदरसमोर नेण्यात आलं होतं तर मला  इथं आल्यानंतर कैद करण्यात आलेलं आहे; हा फरक लक्षात घ्या साहेब.

कांबळे : (वाढत्या संतापानं माणसाला मारत सुटतात) फार चुरुचुरु बोलतोहे नाही का? थोबाडच फोडून काढतो तुझं... बोल कुठून आलास तू? नाव काय तुझं? गाव कोणतं? शेवंता कुठची? काय केलंस तिचं तू? कुठाय ती? बोल साल्या बोल नाही तर तुझी चामडी सोलून गिधाडांच्या समोर टाकतो.

माणूस : त्यासाठी गिधाडांचा शोध घेत बाहेर फिरावं लागणार नाही तुम्हाला.

पिसाळ : म्हणजे?

माणूस : पोलिसांसमोर टाकलं की झालं. (हसतो)

पिसाळ : (आपणही एक ठोसा मारत) पोलिसांना गिधाडं म्हणतोयस साल्या?

माणूस  : म्हणतोय म्हणजे काय, म्हणतोच आहे. पण त्यात थोडा फरकही करायला हवा. कॉन्स्टेबल्स म्हणजे गिधाडं तर इन्स्पेक्टर्स म्हणजे गिधाडांचे राजे... गृधराज (हसतो)

कांबळे : (संतापतिरेकाने टेबलावरील पाण्याचा ग्लास उचलतात आणि त्यातील पाणी माणसाच्या तोंडावर मारतात. त्याच्या डोकीचे केस पकडून त्याच्या नजरेचा निर्याणकपणे वेध घेत) तुला शेवटची संधी देतो, बोल नाव काय तुझं?

माणूस : (वेदनांनी पिळवटून क्षणभराच्या सुटकेसाठी) शंकर काशीनाथ जोशी.

कांबळे : वय?

माणूस :  बेचाळीस वर्षे.

कांबळे : राहणार?

माणूस : तळेगांव दाभाडे, जिल्हा पुणे.

कांबळे : (रिलॅक्स होत) आलास ना वळणावर?

माणूस : मला वळणावर आणण्यासाठी आमच्या तीर्थरुपांनी या पेक्षाही अधिक भयानक युक्त्यांचा अवलंब केला होता पण त्यांनाही त्यात यश आलं नाही...

कांबळे : म्हणजे आता तू जे नाव—

माणूस : सांगितलं ते खोटं होतं!

कांबळे : यू बास्टर्ड . . .

माणूस : कशाला ब्लडप्रेशर वाढवून घेताय साहेब? माझं नाव काय याला काहीच अर्थ नाही. ते जर लोकांना समजलं तर ते माझ्यासाठी एखादी सत्कार समिती स्थापन करतील आणि सामान्य जनतेला नाहक भुर्दंड पडेल त्याचा. त्यामुळे त्या फंदात न पडता अडचणीत सापडलेल्या शेवंताला कसं सोडवता येईल याचा विचार करा.

कांबळे : असा सल्ला देणारे गुन्हेगार मला फार आवडतात. कारण मी त्यांना यथेच्छ तुडवू शकतो.

माणूस : एक तर मी तुम्हाला योग्य तोच सल्ला दिलाय आणि दुसरं म्हणजे मी गुन्हेगार नाही.

कांबळे : आधी माझासुद्धा तसाच समज झाला होता. पण गोन्साल्वीससाहेबांचा फोन आल्यानंतर खात्री झाली.

माणूस : काय सांगितलं त्यांनी? एक अज्ञात इसम एका बाईवर बलात्कार करून पळून गेलाय, असंच ना?

कांबळे : बराच मनकवडा दिसतो की रे!

माणूस : आणि तुम्हांला ती बाई म्हणजे शेवंता आणि तो इसम म्हणजे मी असंच वाटलं, बरोबर? (कांबळेंना चीड येईल असं हसतो. असे योगायोग फक्त फालतू हिंदी सिनेमांत येतात साहेब. अशा अनेक चित्रापटांचे निर्माते स्वत:च लफंगे आणि बदमाष असतात. ते स्वत:च्या अकलेचं दिवाळं तर जाहीर करतातच पण त्याचबरोबर पोलिसखात्याच्या अकलेचेही धिंडवडे काढतात.

कांबळे : माझं लक्ष विचलित करण्याचा प्रयत्न चाललाय तुझा पण असा फसणारा माणूस नाही मी! तुला कसं वळणावर आणायचं आणि तोंड कसं उघडायला लावायचं यासाठी एक योजना आधीच तयार करुन ठेवली होती मी.

माणूस : आता आणखी कसली योजना? बर्फाच्या लादीवर झोपवणार की विजेचे झटके देणार?

कांबळे : का? घाबरलास?

माणूस : ज्यांना घाबरावं अशी थोर माणसं आता राहिलीत कुठं साहेब?

कांबळे : इतकी मस्ती?

माणूस : (हसतो)

कांबळे : ('तुला दाखवतोच आता' अशा अर्थानं पाहात पिसाळला हाक मारतात ...) पिसाळऽऽऽ

पिसाळ : यस सर?

कांबळे : जरा त्या डब्या घे इकडं!

पिसाळ : आणतो साहेब. (असं म्हणून त्या ट्रंकेतून दोन डब्या बाहेर काढतो आणि कांबळेंना आणून देतो. कांबळे त्या डब्या माणसाला दाखवतात.)

कांबळे : काय असेल ह्या डब्यांमध्ये असं वाटतं तुला?

माणूस : दुसरं काय असणार? एकीत तंबाखू आणि एकीत चुना. तंबाखू खाऊन ताजेतवाने होऊन माझा नव्याने छळ करण्याची योजना दिसतेय तुमची.

कांबळे : आपण घाबरलेले नाही असं दाखविण्यासाठी मुद्दाम विनोद करतोहेस तू. पण आता काही क्षणांतच तुझी ही कॉमेडी शोकांतिकेत परावर्तीत झालेली पाहायला मिळणार आहे आम्हाला.

माणूस : तुम्ही इथे जर काही नाटकाचा प्रयोग- बियोग करणार असाल तर ह्या डब्यांमध्ये मेकपचे रंग असतील आणि तुम्ही खलनायक म्हणून रंगवणार असाल मला!

कांबळे : ( क्रूर हास्य करीत) नीट लक्ष देऊन ऐक मित्रा, ह्या डब्यांमध्ये मुंग्या भरून ठेवल्यात... महाभयंकर जातीच्या मुंग्या! हिच्यात काळ्या आणि हिच्यात लाल. ह्या मुंग्यांचा एकेक डंख इतका जीवघेणा असतो की, पाहता पाहता मोठेमोठे बलाढ्य प्राणीदेखील गोगलगायीसारखे निमूट होऊन पडतात. हिंस्त्र श्वापदांना माणसाळवण्यासाठी काही देशांत अजूनही यांचा वापर केला जातो. आपल्याकडे सातपुड्याच्या जंगलात मुंग्यांची ही जात अजूनही सापडते. रोगप्रतिकारक शक्ती वाढावी म्हणून काही रानटी जमातींतील तरूणांना एक रात्र ह्या मुंग्याच्या सहवासात ठेवण्याची पद्धतसुद्धा आहे बरं का! मोठ्या कष्टानं मिळवल्यास मी त्या... अट्टलातल्या अट्टल बदमाषाला तोंड उघडायला लावण्यासाठी आजवर अनेकदा त्यांनी मदत केलेय मला. आज पुन्हा एकदा त्या प्रसंगाचा साक्षीदार होण्याची वेळ आलीय माझ्यावर...

माणूस : ( निर्भयपणे ) एक प्रश्न विचारू साहेब? तुमच्या ह्या मुंग्या महाभयंकर आहेत, त्या मला चावणार मग मी तोंड उघडणार हे सर्व खरं आहे पण लाल आणि काळ्या अशा दोन रंगांच्या मुंग्या बाळगण्याचं कारण काय?

कांबळे : तुझ्यासारख्या बुद्धिमान माणसाला इतकी साधी गोष्ट कळू नये?

माणूस : साध्या-साध्या गोष्टींवर विचार करण्यसाठी बुद्धी खर्च घालण्याची सवय नाही ना आपल्याला!

कांबळे : तुझ्या ह्या अहंकाराचा फुगा आता लवकरच फुटणार आहे. ऐक, ह्या लाल आणि ह्या काळ्या मुंग्या परस्परांच्या कट्टर शत्रू आहेत. त्या एकमेकींना नुसत्या दिसल्या तरी त्यांच्यात तुंबळ युद्ध सुरु होतं. आणि मग दिसेल

त्या वस्तूचा अधिकाधिक त्वेषानं त्या चावा घेत सुटतात. ह्या मुंग्या आता मी जेव्हा तुझ्या अंगावर सोडीन तेव्हा तू काही क्षणातच भरतनाट्यम, कथ्थक, कुचिपुडी, यासारखे नृत्यप्रकार एकाच वेळी सुरु करशील आणि पोपटासारखा बोलायला लागशील. (एक डबी माणसाच्या तोंडाजवळ नेत थंड धारदारपणे) बोल... तू कोण, कुठला? शेवंताचं काय केलंस? बोल... बोल हरामजाद्या!

माणूस : तुम्हांला खरं सांगतो साहेब 'शेवंता जित्ती हाय' ह्या एका वाक्यपलीकडे मला तिची काहीही माहिती नाही.

कांबळे : बघ, अजूनही विचार कर!

माणूस : मी खरं तेच सांगतोय साहेब.

कांबळे : खरं काय आणि खोटं काय ते समजेलच आता. (डबीचे झाकण उघडून, त्याची कॉलर वर करून त्याच्या पोटाच्या दिशेने ती उपडी करतात आणि हसत सुटतात. माणूस निकराने शांत, अविचल राहण्याचा प्रयत्न करतो पण हळूपळू त्यांचं स्वत:वरचं नियंत्रण सुटत जातं.)

माणूस : आ..हा... आई आई..गं... ओऽऽ (मुंग्यांशी बोलतो) जरा सावकाश गऽऽ बायांनो...आई... आई आई... ( हसू लागतो) अग गुदगुल्या करायल्या नाही सांगितल्या साहेबांनी, चावायला सांगितलंय - चावायला! आणि बरं का, चावताना जास्त खोलवर चावे घेऊ नका, नाहीतर माझ्या रक्तातलं अल्कोहोल तुमच्या पोटात जाईल आणि मग झिंगून पडाल तुम्ही! कदाचित मरणसुद्धा पत्करावं लागेल तुम्हाला! (हसतो. हसता हसता वेदनांनी पिळवटत आहे.)

कांबळे : (निकराचा प्रयत्न करीत) बोल, शेवंताचं काय झालं? काय केलंस तिला?

माणूस : मला माहीत नाही साहेब....

कांबळे : आय सी... (दुसरी डबी उघडतात आणि त्याच्या शर्टची कॉलर वर उचलून पाठीवर ओततात. माणूस वेदनांनी तडफडू लागतो, ओरडू लागतो.) बोल शेवंता खरंच जिवंत आहे का मेली?

माणूस : मला माहीत नाही.

कांबळे : कुठाय ती?

माणूस : ते तुम्हीच शोधून काढा.

कांबळे : विद्या सडोलीकर तुझी कोण होती?

माणूस : (मान हलवत 'कुणीच नव्हती' अस दर्शवतो.)

कांबळे : (हिंस्त्रपणे) नाव काय तुझं?

माणूस : शंकर काशीनाथ जोशी!

कांबळे : खरं बोल भोसडीच्या, नाहीतर जीभ हासडून बाहेर काढतो तुझी! बोल नाव काय तुझं?

माणूस : एस.के.डिसोझा!

कांबळे : खोटं...

माणूस : उस्मान अहमदखां पठाण!

कांबळे : खोटं!

माणूस : रोबिन्द्र चटर्जी, होमर्सजी बाटलीवाला...

कांबळे : बोल साल्या बोल, खरं नाव काय तुझं? नाही तर मुडदा पाडतो तुझा इथं... सांग नाव काय तुझं?

माणूस :  मी ते विसरून गेलोय साहेब...

कांबळे : का? कशासाठी विसरलास स्वत:चं नाव?

माणूस : कारण स्वत:च्या नावाइतकी घाणेरडी गोष्ट आणि ते इतिहासात सुवर्णाक्षरांनी वगैरे लिहून ठेवलं जाण्याची अपेक्षा यासारखा क्षुद्रपणा जगात दुसरा कोणता नाही साहेब... मी मेलो तर पंचनाम्यात नाव काय लिहायचं ही तुमची अडचण मी समजू शकतो साहेब... म... मी... मी... मी जर इथं असाच मेलो ना साहेब त... त... तर तुमचा पंचनामा एका ओळीत आटपून टाका साहेब, त्यात असं लिहा की धुक्यात शिल्प कोरण्याचा चक्रमपणा करू पाहणारा एक अज्ञात इसम येथे चीरविश्रांती घेत आहे! (वरच्यावर मान टाकून बेशुद्ध होतो. दोनचार क्षणांच्या शांततेनंतर फोन एकदम हिंस्त्रपणे वाजू लागतो. कांबळे फोनकडे वळतात. फोनजवळ येऊन तो उचलतात.)

कांबळे : हॅलोऽऽऽ इन्स्पेक्टर सयाजीराव कांबळे स्पीकिंग! कोण, गोन्साल्वीससाहेब? नमस्कार सर! व्हॉट कॅन आय डू फॉर यू सर? येस सर ... येस सर ... हां... हां... आपण काल जी केस सांगितली होती ती? अच्छा... अच्छा... काय? सापडला तो आरोपी? आय सी... ओ. के. सर... थँक्यू सर... (हताशपणे फोन खाली ठेवतात. हळूहळू खुर्चीचा आधार घेऊन खाली बसतात आणि पिसाळला हाक मारतात.) पिसाळऽऽऽ

पिसाळ : येस सर?

कांबळे : जरा पाणी घेऊन ये.

पिसाळ : आणतो सर! ( असं म्हणून समोरचा रिकामा ग्लास उचलून बाहेर पळतो. कांबळे अतिशय करुणेने माणसाकडे पाहातात. त्याचे अस्पष्ट कण्हणे ऐकू येते. पिसाळ धावतच पाणी घेऊन येतो. त्याच्या दुसऱ्या हातात एक कागद. कांबळेंच्या हातात तो ग्लास देतो. ते घटाघटा पाणी पिऊन ग्लास टेबलावर ठेवतात. पिसाळ आपल्या हातातील कागद त्यांच्यासमोर धरतो.)

कांबळे : काय आहे ते?

पिसाळ : वायरलेस मेसेज... (अधाशीपणे मेसेज वाचतात. तसतसे त्यांचे डोळे विस्फारले जातात. वाचता वाचता ते उभे राहतात आणि मग एका आवेगाने माणसाजवळ येतात. त्यांच्या केसातून प्रेमळपणे हात फिरवतात, तो शुद्धीवर

आहे का ते पाहतात. माणसाचे कण्हणे आता अधिक स्पष्टपणे ऐकू येते. तो किंचितसे डोळे उघडून कांबळेंकडे प्रश्नार्थक नजरेने पाहातो.)

कांबळे : (तत्परतेने) पिसाळऽऽऽ

पिसाळ : येस सर?

कांबळे :  ती बाटली घे इकडं... लवकर!

पिसाळ : येस सर. ( म्हणून तातडीने ट्रंकेतील दारूची बाटली काढून कांबळेंच्या हातात देत) ही घ्या साहेब.

( कांबळे बाटलीचे बूच उघडून. माणसाचा चेहेरा वर उचलतात आणि हळूहळू त्याच्या तोंडात दारु ओतू लागतात. दारुच्या वासामुळे आणि ती पोटात गेल्यामुळे माणूस चांगला सावध होतो.)

माणूस : धन्यवाद कांबळेसाहेब धन्यवाद! उशीरा का होईना पण तुम्ही शब्दाला जागलात. अजून द्या थोडी!

कांबळे : ( समोरचे ग्लास उचलून त्यात दारू ओततात. आणि ग्लास माणसाच्या ओठाला लावत) सावकाश, सावकाश...

माणूस : (ग्लास एका दमात रिकामे करून) इतकी मेहेरबानी का साहेब?

कांबळे : (त्याला सोडत) तुला एक बातमी सांगायची होती.

माणूस :  कसली बातमी?

कांबळे : मी काल कंट्रोलरुमवरून हरवलेल्या व्यक्तिंची माहिती मागविली होती...

माणूस : मग?

कांबळे : त्या संबंधीचा हा वायरलेस मेसेज...

माणूस : काय म्हटलंय त्यात?

कांबळे  : सांगली जिल्ह्याच्या मिरज तालुक्यातील नागलवाडी गावची एक बाई गेल्या महिन्यापासून बेपत्ता आहे.

माणूस : नाव काय तिचं?

कांबळे : शेवंता!

(माणूस त्या क्षणाच्या अचाट सामर्थ्यामुळं भारावून गेलाय. त्याच्या तोंडून सावकाश पण दमदारपणे एकेक शब्द बाहेर पडू लागतो...)

हे विश्व सारे विहारास माझ्या पुरेसे न होईल शंका नको,

हा मर्त्य, हा देह कारानिवासी बळे हीन हा कोणी काही बको

मी मर्त्य, मी मृत्यूला जिंकणारा,जगी धूळ मी दिव्यता उज्ज्वल.

बोला हवे ते मला काय त्याचे? पुरे जाणतो मीच माझे बळ

(कांबळेंच्या हातातून तो बाटली ओढून घेतो. आणि बाटलीनेच घटाघटा पिऊ लागतो. कांबळे आणि पिसाळ दोघंही बधीरपणे पाहाताहेत. हळूहळू पडदा.)

**मध्यंतर**

***

सूचना :

- या नाटकाचा पहिला अंक येथे दिलेला आहे ज्यांना आवश्यकता असेल त्यांनी पुढील पत्त्यावर माझ्याशी संपर्क साधून दुसरा अंक प्राप्त करून घ्यावा.
-
- या नाटकाचे सर्व हक्क लेखकाकडे राखीव आहेत.प्रयोगापूर्वी लेखकाची परवानगी घेणे बंधनकारक आहे. या नाटकाचे  भाषांतर, रूपांतर, त्यावर आधारित चित्रपट, चित्रमालिका, वेब-सिरीज, अभिवाचन, यूट्युब-फेसबुकवरील (किंवा अशाच प्रकारच्या विद्यमान अथवा भविष्यातील नव्या माध्यमातून) पूर्ण किंवा अंशतः असा कोणत्याही प्रकारचा आविष्कार, चित्रिकरण, ध्वनिमुद्रण, प्रसारण इत्यादीपूर्वी लेखकाची पूर्व परवानगी घेणे आवश्यक.यासंदर्भात काही वाद उद्भवल्यास संबंधित कायदेशीर कारवाई मुंबई कार्यक्षेत्रात होईल!

**प्रल्हाद जाधव (९९२००७७६२६)**
pralhadjadhav.one@gmail.com

***